भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२७/०८/२०१६

**१) पैश्याच्या वादावरुन मुलास जिवानिशी ठार केले व पत्नीला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०८/०१६ रोजी ९.५० वा. दर. यातील आरोपीने आपला मुलगा हरेन्द्र जयेन्त शरणागत वय २२ वर्ष, रा. मोहाडी खापा यास पैसे का देत नाहीस या कारणावरुन भांडण करुन मुलगा हा रात्री खाटेवर झोपला असता लोखंडी सब्बल ने त्याच्या डोक्यावर, कपाळवर मारुन जिवानिशी ठार केले व आरोपीची पत्नी सौ. शामकला जयेन्द्र शरणागत वय ४५ वर्ष, ही जखमी मुलास वाचविण्यास आली असता तिच्या डोक्यावर सब्बल मारुन जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केला असे फिर्यादी दुर्गाजी छबुलाल शरणागत वय ३० वर्ष, रा. खापा मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३०२,३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जायले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) घरातील सोने,चांदीच्या दागीण्याची व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २५/०८/२०१६ चे १४.००वा. ते २६/०८/२०१६ चे ०८.०० वा. दर यातील फिर्यादी सौ. सरोज शिवकुमार जलपान वय ५४ वर्ष, रा. गुरुनानक वार्ड तुमसर ही स्वतांचे घराला ताला लावुन दिराची प्रकृती बिघडल्याने त्याला पाहण्यास गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या आलमारीतुन सोन्याची चैन १० ग्रॅम १ लक्ष्मीपती सोन्याचा हार २५ ग्रॅम, ३ सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ५ ग्रॅम, ३ जोड टॉप्स सोन्याचे १५ ग्रॅम, १ सोन्याची रिंग ५ ग्रॅम, सोन्याची बिंदी ४ ग्रॅम, नाकातील खडा १ ग्रॅम, चांदीचे पायल ५ तोडे, चांदीचे जोडवे व बिछवे २ तोडे, आकडा व नगदी २०,०००/–रु. असा एकुण २,२७,४००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि. शेटे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :–**

दिनांक २६/०८/२०१६ रोजी १९.३० वा. दर. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६/डी ९५४५ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूच्या नशेतएनएच ६ रोडवर आडवीतीडवी चालवितांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोशि. जांभुळकर पो. स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहे.

**४) रात्रीचे वेळी अंधारात दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्‌देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०८/२०१६ रोजी ०१.०० ते ०१.३० वा. दर. दरम्यान आरोपी आरोपी हा रात्री अंधारात आपले अस्तीत्व लपवुन कोणीतरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या हेतुने मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १२२ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.